The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# "संत साहित्यातून जीवन मूल्यांची रुजवणूक"

**मार्गदर्शक : प्रोफेसर डॉ. तुषार चांदवडकर**
**संशोधक विद्यार्थी : श्री. सचिन दिलीप अहिरे**
**मराठी संशोधन केंद्र, केटीएचएम महाविद्यालय, नाशिक**

"जागच्या कल्याणा संताच्या विभूती,
देह कष्टाविती परउपकारें."

महाराष्ट्र ही संताची जन्मभूमी म्हणुन ओळखली जाते. महाराष्ट्राच्या मातीतला प्रत्येक कण हा संताच्या पावन पदस्पर्शाने न्हाऊन निघाला आहे. अशा या पावन भूमीत अनेक संतांनी जग उध्दारासाठी जन्म घेतला.

संतांचे साहित्य हे चळवळीचे साहित्य आहे. आठरापगड जातीतील लोकांचे आहे. तिथेही विद्रोह आहे. स्वतःची आत्माविष्काराची वेगळी वाट आहे. पण ते अभिनिवेशापेक्षा मानवी कल्याणावर आणि लोकोध्दारावर अधिक भर देणारे आहे. संतांच्या लेखनातून समकालीन लोकभावनेचे प्रतिबिंब उमटले म्हणून या लेखनाला चिरकालीनतेचे वरदान लाभले, आजच्या जागतिकीकरणाच्या लाटेतही मुल्यप्रधान साहित्य म्हणून आजही संतसाहित्याने आपले आव्हान कायम ठेवलेले आहे. आपले समकालीन प्रश्न, समकालीन समाजवास्तव आणि समकालीन जीवन जाणिवा त्यांनी आपल्या लेखनातून मांडल्या. समाजाच्या नैतिक अवनतीला रोखण्याचे कामही त्यातून केले.

जगाकडुन संतांना हिन वागणूक जरी मिळत होती तरी त्यांनी ते सर्व दुर सारून जगाचा उध्दार व दया, क्षमा, शांती या मार्गाने भक्तीचा महिमा वर्णिला आहे. संतांनी जग निंदा सोडुन भक्तीमार्ग अवलंबला व दांभिकतेमुळे लयाला जाणाऱ्या मानवजातील तारण्याचे काम संतानी केले आहे. त्याच प्रमाणे मराठी भाषेला मानाचे व राजभाषेचे स्थान साहित्य क्षेत्रात मिळवून देण्याचे काम हे संतांच्या काव्यरुपी साहित्याने केले आहे. अज्ञानाच्या डोहात अडकलेल्या समाजाला वाचवण्याचे काम तसेच अनिष्ठ परंपरा, चालिरितींना आळा घालण्याचे उपदेशात्मक कार्य हे आपल्या संत मंडळींनी केलेले आहे.

महाराष्ट्र भूमीत समाजाला दिशा देणाऱ्या संतांमध्ये ज्ञान म्हणजे काय? त्याची महती सांगणारे व वारकरी संप्रदायाचा पाया घालणारे श्रीसंत माऊली ज्ञानेश्वर, भक्तीची शक्ती सांगणारे व पांडुरंगाचे लाडके असे श्री नामदेव, रंजल्या-गांजलेल्या जनतेत त्यांच्या आत्म्यात परमात्मा शोधणारे नाथमहाराज, राष्ट्रवाद जनलोकात चेतवणारे समर्थ रामदास तसेच सेना न्हावी, नरहरी सोनार, बंका, गोरोबा कुंभार, चोखोबा, स्त्री संतामध्ये जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, मुक्ताबाई असे अनेक संत मंडळी व पाखंडाचे खंडन करून सोडणारे श्रीसंत शिरोमणी जगतगुरू तुकोबाराय म्हणजेच वारकरी संप्रदायाचा कळस होय.

"ज्ञानेश्वरांची 'ज्ञानश्वरी' एकनाथांची भागवताच्या एकादशस्कंदावरील टीका 'एकनाथी भागवत' आणि तुकारामांची 'गाथा' हे तीन ग्रंथ म्हणजे या संप्रदायाची प्रस्थानत्रयी समजली जाते."

मार्गाधारे वर्तावे। विश्व हे मोहरे लावावे।
अलौकिका न व्हावे । लोकांप्रती ।।

संत ज्ञानेश्वरांच्या वचनाला मराठी माणसाच्या दृष्टीने मोठा अर्थ आहे. अवघ्या महाराष्ट्राला संत साहित्याचा समृद्ध असा वारसा लाभलेला आहे. अर्थात, जगातील कोणत्याही समाजाला जेव्हा संपन्न विचारवंतांचा वारसा लाभतो, परंपरांचे सातत्य लाभते, तेव्हा तो समाज, त्याचे मन अधिकाधिक प्रगल्भ होत असते. मराठी समाजाला संत मंडळाच्या प्रचंड प्रेरणा मिळाल्या आहेत. त्यामुळेच सामाजिक जीवनाच्या दिशा संपूर्ण उजळून निघाल्या आहेत. संत आपला विचार सतत कवितेमध्ये मांडत गेले. काव्यातून स्वतःच्या आचरणाचा आदर्श लोकसंस्थेपुढे ठेवत गेले.

नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी। हा नामदेवांसारख्या संतांनी मांडलेला विचार समाजात जीवन मूल्य पेरीत सर्वदूर पसरला. उजळावया आलो वाटा। ही शिक्षकाची भूमिका त्यांनी बजावली, संतांचे लौकिक जीवन, त्यांचे साहित्य, त्यांचा साहित्य विचार, त्यांनी केलेले उद्बोधन व लोकसंस्कार या सर्वांचा विचार केला तर त्यांचे कार्य निश्चितपणे वैश्विक स्वरूपाचे आहे. संतांनी सामाजिक विषमतेवर सातत्याने कडाडून टीका केली. आजही समाजामध्ये पूर्णतः समता निर्माण झालेली नाही त्यामुळे संत साहित्यातील हा विचार लोकांना प्रबोधन करायला महत्वपूर्ण ठरू शकतो. ऐसे कैसे झाले भोंदू कर्म करोनी म्हणती साधू। अशी भोंदू साधूंवर तुकोबांनी आपल्या अभंगातून काठी चालविली. आजही शुद्र देवता, तंत्रमंत्र, जादूटोणा, भानामती गंडा यातून समाजात निर्माण झालेली अंधश्रद्धा लक्षात घेता लोकांना निखळ भक्तीचे तत्त्वज्ञान व खरी श्रद्धा हे संत साहित्यच सांगू शकते.

संतांनी समाजाला दिलेला विचार हा मानवतावादी आहे. चांगला विचार, जीवनमूल्य काळ बदलला तरी बदलत नसतात. परिवर्तीत काळाबरोबर समाजाच्या सर्व स्तरावर अनेक आव्हाने उभी आहेत. अशी आव्हाने पेलण्याची क्षमता, सामर्थ्य हे संतांच्या विचारांमध्ये आहे, आज समाज विस्कळीत झालेला आहे. नैतिकतेचा व आदर्श जीवनमूल्यांचा कणा मोडलेला आहे. गटतट आणि कमकुवत विचारांनी समाज पोखरत चाललेला आहे. अशा स्थितीत अशांत असलेल्या समाजाला संत साहित्यच आत्मिक समाधान देऊ शकते. माहितीच्या जागाचा शोध घेतांना आणि जागतिकीरणाच्या चक्रात माणूस माणसाला पारखा होत आहे. दैनंदिन जीवनाची धावपळ वाढली आहे. एखादा चांगला विचार आपल्यापर्यंत पोहचत नाही. या वाढत्या मी-तू पणाच्या काळात संत साहित्याचा विचार मात्र मनात चांगल्या भावना निर्माण करू शकतो. मानव जातीत अखंड प्रेम, मनाचा संयम, परमतसहिष्णूता, अभय, क्षमा, शांती हे संतांचे दैवी गुण आजच्या काळात महत्त्वाचे आहेत.

जे जे भेटू भूत ते ते मानिजे भगवंत। हा ज्ञानेश्वरीतील विचार किंवा दया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती। हा तुकोबांचा विचार मानवी मनाला मूल्याधिष्ठित शिक्षण देणारा आहे. आज समाजात खूप वाईट मार्गान पैसा खेळू लागला आहे. पैशाने सुख समृद्धि मिळते असा समज आहे.

सुखाने बेहोश झालेली तरूणपिढी समृद्धीच्या झंझावात बेभान झालेली आहेत. पालकही कुठेतरी मुलांकडे दुर्लक्ष करीत आहेत. ह्या चंगळवादावर तुकोबांचा जोडूनिया धन उत्तम व्यवहारे। हा विचार महत्त्वपूर्ण ठरतो, कमी कष्टात जास्त फळ मिळविण्याचा माणसाचा प्रयत्न मोठा आहे. संतांनी समाजाचे सूक्ष्म निरिक्षण केले होते. निरिक्षणातून सभोवतालच्या परिस्थितीचे चित्रण आपल्या ओवी, अभंगात केले आहे. म्हणोनि जे जे उचित अवसरे करूनि प्राप्त दंड तेते कर्म हेतू रहित अचरितू। कर्म करतांना वासना, विकार, स्वार्थ, कलुषित वृत्ती सहज सोडावयास सांगितली. माणसातले हिणत्व काढून तो मनुष्य निखळ स्वच्छ करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या विचारातून केला. संतांच्या साहित्यातील शब्द केवळ सुंदर होते असे नाही. तर त्या शब्दातील विचारही पवित्र होते. त्यामुळे त्यांच्या शब्दाला सामर्थ्य, बळ प्राप्त झाल्यासारखे वाटते.

महाराष्ट्राच्या मध्ययुगीन काळात समाजाचे चित्र अनेक संतांनी रेखाटले आहे. संत नामदेवांनंतर संत एकनाथांनी आपल्या अभंगातून हुबेहूब समाजनिरिक्षणे मांडली आहेत. एकनाथांच्या स्फुट लेखनात त्यांच्या भारूडांनी समाजाचे उद्‌बोधन आणि लोकशिक्षण केलेले आहे. अंधश्रध्दा टाळून डोळस भक्तीची जाणीव दिली. नाथांच्या एकूण रचनेमध्ये संपूर्ण भारूडच नाथकालीन समाजदर्शनाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. साधा सरळ भक्तीमार्ग सोडून अन्य फसव्या मार्गाने जाणाऱ्या भोळ्या भाबड्या जनलोकांच्या आध्यात्मिक अधोगतीचे आणि सामाजिक अवनतीचे एक प्रभावी दर्शन नाथांनी भारूडातून घडविले आहे. आजही नाथांच्या या विचारांची गरज जाणवते. आजच्या काळात समाजमनातील जातीजमातीतील भेदभाव, धर्मांधता, एकमेकांशी तुच्छतेने वागणे, हक्कांची पायमल्ली करणे या गोष्टी वारंवार घडतात याला तुकोबांनी दिलेले उत्तर आहे. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ। आईकाजी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हीत सत्य करा। कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्मे सर्वेश्वर पूजनाचे। तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव देहपावे।।

आपण सारे ईश्वराचीच लेकरे आहोत हे सांगतांना तुकोबांनी एकमेका साहय करू अवघे धरू सुपंथ। हा सहकार्याचा बंधुभाव तुकोबांनी मांडला. अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळा माळ असो नसो। अशा प्रकारच्या निर्मळतेची अपेक्षा तुकोबांनी समाजाकडून केली. पुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज असतील किंवा संत गाडगेबाबा असतील यांनी देखील हाच विचार काळात मांडला. भोंदूबाबांच्या बाजारात आज भक्तीचा बाजार मांडलेला आहे. तीर्थक्षेत्रेही मनोरंजनाची ठिकाणे होत आहे. 'पीके' असो किंवा 'देऊळ' सारखा चित्रपट असो या भोंदूगिरीचे अचूक वर्णन करीत आहे. तेव्हा या सध्य परिस्थितीत संत साहित्य ही काळाची गरज ठरत आहे.

संतांनी आपल्या साहित्याचा परमार्थाच्या क्षेत्रातील परिवर्तनासाठी वापर केला. व्यापक अशा संपूर्ण सामाजिक परिवर्तनासाठी लोकनेत्यांना बाहय परिस्थितीही अनुकूल व्हावी लागते. संतांनी हे ओळखले आणि परमार्थाच्या मर्यादित क्षेत्रातच परिवर्तन घडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मात्र त्याचे परिणाम सामाजिक क्षेत्रावरही झालेले दिसून येतात. संत सामाजिक कायद्यात बदल करू शकत नव्हते, पण ज्या धर्म संस्थेची सामाजिक व्यवहारावर पकड होती, त्या धर्म संस्थेला शुद्ध करण्याचे

प्रयत्न संतांनी केले. विविधता मिटवून एकता आणि समानता स्थापित करण्याची त्यांची धडपड होती, भक्तीचा सोपा मार्ग त्यांच्या साहित्याने दाखविला. कर्मकांडाला दूर सारून सुजनसुलभ अशी ईश्वरी उपासनेची रित संतांनी घालून दिली. आचार विचारांमधील विकृती दूर सारली. त्यांचा भक्ती मार्ग लोकांना संसारापासून दूर नेणारा नव्हता, संसारात राहूनच लोकांना परमार्थ साधन करावे असा उपदेश संतांनी आपल्या अभंगातून केला. संतांनी सामान्य माणसांपर्यंत ज्ञान पोहचावे यासाठी आग्रह धरला आणि लोकांच्या बोलीभाषेत साहित्यनिर्मिती केली. ही रचना सर्वजनसुलभ अशा प्रकारची आहे. संतांनी आपल्या साहित्यातून जे विचार मांडले त्यांच्या प्रसाराची माध्यमे ही लोकांना परिचित, त्यांच्या आयुष्यात रुजलेली, लोकसंस्कृती मधली माध्यमे वापरली.

एकंदरीत समाज घडविण्यात संताचे योगदान मोठे असुन त्यावरच आज समाजाची बैठक कायम म्हणावी लागेल. संताचा विचार, संताची शिकवण, त्यांचा मार्ग, त्यांची चळवळ ही विकासाकडे झेपावत जाणाऱ्या समाजासाठी मोठी पर्वणीच आहे. म्हणून समाजाच्या जडण घडणीत संत साहित्याचे योगदान महत्वाचे ठरते. आज खऱ्या अर्थाने समाजात नैतिक मूल्य, जीवनमूल्य रुजवायची असतील तर मात्र संत साहित्याचे नव्या पिढीकडुन पुनर्वाचन होणे गरजेचे आहे.

**संतसाहित्यातील मूल्यांची काही वैशिष्टये :**

"१) संतसाहित्यातील मूल्य हे मध्ययुगीन कालखंडाच्या पार्श्वभूमीला अनुलक्षून हाताळले असल्याने सहजच त्यांना धर्म आणि नीतिचे अधिष्ठरन लाभले आहे.

२) संतसाहित्यातील मूल्य हे धर्म आणि नीतिवर अधिष्ठित असले तरी ते आचार, विचार आणि भावजीवनाला पूरक ठरणारे आहेत. त्यामुळे त्यांचे महत्व आज ही कमी झालेले नाही.

३) संतांनी समाजाला मूल्य रुजविण्यासाठी भक्ती या साधनेला विशेष महत्व दिले आहे, भक्तीमुळे त्या काळात अठरापगड जातीतले लोक एकत्रित येऊ शकले.

४) संताच्या भक्तीला विवेकाचे अधिष्ठान लाभल्याने संतांची भक्ती आंधळी होती असे म्हणता येणार नाही.

५) संत साहित्यातील मूल्यांमागे संताचा अनुभव आहे. त्यामुळे ती मूल्ये अनेकांना प्रेरणादायी वाटतात.

६) संत साहित्यातील मूल्य व्यक्ती आणि समाजाच्या जडणघडणीत उपकारक ठरणारी आहेत, ती मूल्ये सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी सांगितलेली आहेत."

वरील सर्वच संतांनी सांगितलेली मूल्ये समाजाच्या जडणघडणीसाठी उपयुक्त असून ती "बुडता हे जन न देखवे डोळा। म्हणेनि कळवळा येतो मनी।" हे संत तुकारामाचे वचन समाजाला तंतोतंत लागू पडते. कारण आज समाज पुन्हा कर्मकांड, व्रतवैकल्य, धर्मांधतेकडे वळतांना दिसतो. म्हणून संतांनी सांगितलेली मूल्येच समाजाला तारु शकतील आणि पुन्हा मानव समाज एक आदर्श समाज म्हणून जीवन जगू शकेल यासाठी संतसाहित्याचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे सत्य लोकांपर्यंत पोहचले पाहिजे. हेच वास्तव आज समाजातून हद्दपार होतांना दिसते हिच खरी शोकांतिका आहे. या पार्श्वभूमीवर संतांच्या चरित्राचे, त्यांच्या अभंगगाथेचे, त्यांच्या सामाजिक आणि आध्यामिक-

धार्मिक विचारांचे पुनर्मूल्याकंन करण्याची गरज आहे. जी समाजाच्या जडणघडणीत उपयुक्त ठरु शकेल आणि जीवनमूल्यांची रुजवनूक होऊ शकेल.

**निष्कर्ष :**

१) संतांनी अनेक जीवन मुल्ये प्रचारात आणली, कर्मनिष्ठा, भूतदया, परोपकार, समता, बंधुता, प्रेम, शांती, दया, क्षमा, करुणा अशा अनेक मानवतावादी मुल्यांची त्यांनी जोपासना केली.

२) संतांनी समाजव्यवस्थेला धक्का न लावता स्त्री शूद्रांना आत्मविकासाची वाट खुली करून दिली. त्यांचे नैतिक सामर्थ्य वाढविले.

३) मनुष्य कोणत्याही जातीचा असो, त्याला आत्मोद्धाराची संधी आहे असा विद्यास संतांनी त्यांच्यामध्ये निर्माण केला.

४) सामाजिक वर्ग आणि वर्ण यांच्यामधील भेदांची जाणीव आणि सामाजिक जीवनातील दु:खांचा निषेध संत साहित्यातून प्रकटतो.

५) संतांनी उपदेशासाठी, साहित्यासाठी लोकभाषेचा वापर केला. लोकसंस्कृतीतील प्रसार माध्यमांचा वापर केला.

६) संत साहित्य लेखनाचा हेतू अंधश्रध्दा, अनिष्ठ रुढी नष्ट करुन आदर्श समाज उभारावा तसेच समाजात जीवन मूल्यांची रुजवणूक व्हावी हा होता.

७) सर्व जाती धर्मात, समाजात स्वातंत्र्य समता, बंधुता व एकता ही जीवनमूल्य निर्माण करण्यासाठी संत साहित्य उदयास आले.

८) समाजातील मानवी मनाची मरगळ व वाईट विचार प्रणाली दुर सारण्याचे व प्रेमाचे आपुलकीचे नाते निर्माण करण्याचे काम संत साहित्याने केले.

९) प्रचलित अन्याय अत्याचाराचे निर्मूलन होण्यासाठी नव्या पिढीने संत साहित्याच्या वाचनाचे अनुसरण करावे.

१०) समाजप्रबोधनाच सशक्त माध्यम म्हणून संतसाहित्याकडे पाहिले जाते. समाज जडणघडणीसाठी संत साहित्याचे पुनर्वाचन होणे काळाची गरज वाटते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) श.वा. दांडेकर तुकाराम गाथा आवृत्ती पहिली पृष्ठ क्र. ४२५ अभंग क्र. २२००

२) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड-१, संपा. शं.गो. तुळपुळे महाराष्ट्र साहित्य परिषद, प्र. आ. पृष्ठ क्र. ४७८

३) साहित्याची सामाजिकता - प्रा. डॉ. सतीश बडवे

४) मध्ययुगीन साहित्य : अवलोकन आणि निरीक्षणे. प्रा. एल. जी. सोनवणे कृतज्ञता ग्रंथ, पृष्ठ क्र.१९३